**ठळक बातम्या**

- समाजातल्या गरीब आणि वंचितांच्या उत्थानासाठी सरकार कार्यरत असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन
- वेव्हज परिषद दरवर्षी मुंबईतच होणार, IICT साठी केंद्र सरकार आणि राज्य सरकारमध्ये सामंजस्य करार
- मुंबईकरांना एकाच कार्डवरुन सर्व प्रवासी सुविधांचं तिकिट लवकरच काढता येणार

**आणि**

- शेअर बाजार आणि सोनं - चांदीच्या दरात जोरदार तेजी

**<><><><><>**

समाजातल्या गरीब आणि वंचितांच्या उत्थानासाठी सब का साथ सब का विकास हा मंत्र आणि सेवाभाव हीच आपल्या सरकारची नीती आणि धोरण असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. ते आज मध्य प्रदेशातल्या अशोक नगर जिल्ह्यातल्या आनंदपूर धाम मधल्या गुरूजी महाराज मंदिरात भाविकांना संबोधित करत होते. प्रधानमंत्र्यांनी सरकारच्या विविध कल्याणकारी योजनांचा उल्लेख करत दान हीच खरी मानवसेवा असल्याचं सांगितलं. सरकार समाजातल्या सर्व वर्गांसाठी काम करत असल्याचं ते यावेळी म्हणाले.

त्यापूर्वी प्रधानमंत्र्यांनी गुरूजी महाराज मंदिराला भेट दिली आणि प्रार्थना केली, तसंच मंदिर परिसराची पाहणी केली.

**<><><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू पोर्तूगाल आणि स्लोव्हाकिया या देशांचा दौरा आटोपून मायदेशी रवाना झाल्या आहेत. रवाना होण्यापूर्वी राष्ट्रपतींनी स्लोव्हाकियाची राजधानी ब्रातिस्लाव्हा इथं भारतीय व्यापाऱ्यांच्या शिष्टमंडळाशी संवाद साधला.

**<><><><><>**

वेव्हज परिषद दर वर्षी भरवण्याची प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची इच्छा असून तिचं आयोजन मुंबईतच होईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज वार्ताहर परिषदेत दिली. माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांच्यासह वेव्हजच्या तयारीचा त्यांनी आज आढावा घेतला. अशा प्रकारची जगातली सर्वात मोठी परिषद असून जगभरातल्या १०० पेक्षा जास्त देशांचे प्रतिनिधी यात सहभागी होणार असल्याचं त्यांनी सांगितलं. मुंबईत इंडियन इन्स्टिटट्यूट ऑफ क्रिएटिव्ह टेक्नॉलॉजी स्थापन करण्याबद्दलचा सामंजस्य करार राज्य आणि केंद्र सरकार यांच्यात आज झाला. या क्षेत्राला चालना देण्यासाठी मालाड इथं एक स्वतंत्र यंत्रणा उभारायलाही केंद्र सरकारनं मंजुरी दिल्याचं फडणवीस यांनी नमूद केलं.

वेव्हज २०२५ मुळे नागरिकांच्या सृजनशीलतेला वाव आणि व्यासपीठ मिळेल, असा विश्वास केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी व्यक्त केला.

**<><><><><>**

मुंबईतल्या बेस्ट, उपनगरीय रेल्वे, मेट्रो इत्यादी सर्व प्रवासी सेवांचं एकाच माध्यमातून तिकिट देणारं मुंबई वन कार्ड लवकरच सुरू होणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आज दिली. केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांच्यासोबत वार्ताहर परिषदेत बोलताना ते म्हणाले,

**होल्ड... बाईट- देवेंद्र फडणवीस....**

याशिवाय, छत्रपती शिवाजी महाराजांचा समृद्ध इतिहास, तसंच राज्यातल्या इतर सांस्कृतिक आणि धार्मिक स्थळांचं दर्शन घडवणारी भारत गौरव रेल्वेगाडी येत्या १६ जुलैपासून सुरू होणार असल्याची माहितीही फडणवीस यांनी आज दिली.

यंदाच्या अर्थसंकल्पात महाराष्ट्रातल्या रेल्वे प्रकल्पांसाठी केलेल्या भरीव तरतुदी त्यांनी पुन्हा एकदा अधोरेखित केल्या.

नुकत्याच झालेल्या केंद्रीय मंत्रिमंडळाच्या बैठकीत प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी ४ हजार ८१९कोटी रुपये खर्चून २४० किलोमीटर लांबीच्या गोंदिया-बल्लारशहा रेल्वेमार्गाच्या दुपदरीकरणाला मंजुरी दिली असल्याची माहिती केंद्रीय रेल्वेमंत्री अश्विनी वैष्णव यांनी यावेळी दिली. ते म्हणाले,

**होल्ड... बाईट- अश्विनी वैष्णव....**

मुंबईसाठी लवकरच २३८ नव्या वातानुकूलित उपनगरीय रेल्वेगाड्या आणण्याचा पुनरुच्चार त्यांनी केला. तसंच कवच ५.० लवकरच कार्यान्वित होणार असून यामुळे रेल्वे यंत्रणेची सुरक्षा आणि कार्यक्षमता वाढेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

**<><><><><>**

थोरियम अणुभट्टी विकासासाठी मुंबईत सह्याद्री अतिथीगृह इथे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत महाजेनको आणि रशियाच्या रोसातोम या शासकीय कंपनीसह सामंजस्य करार करण्यात आले. महाराष्ट्रात थोरियम रिॲक्टरचे संयुक्त विकास करणं, अणुऊर्जा नियामक मंडळाच्या सुरक्षा निकषांनुसार थोरियम रिॲक्टरचं व्यावसायिकीकरण करणं, मेक इन महाराष्ट्र उपक्रमांतर्गत थोरियम रिॲक्टरसाठी असेंब्ली लाईनची स्थापना करणं हा या सामंजस्य कराराचा मुख्य उद्देश आहे.

**<><><><><>**

मुंबईत झालेल्या २६/११ दहशतवादी हल्ल्याचा मास्टर माईंड तहव्वूर राणाला भारतात आणण्यात आलं असून या प्रकरणाचा पुढील तपास आणि कायदेशीर प्रक्रियांमध्ये राज्य सरकार राष्ट्रीय तपास संस्थेला पूर्ण सहकार्य करेल, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. तहव्वुर राणाला भारतात आणल्याबद्दल

मुख्यमंत्र्यांनी प्रधानमंत्र्यांचे आभार मानले. या दहशतवादी हल्ल्याचा कट रचणारा म्होरक्या आपल्या ताब्यात असून तपासात आणखी काही गोष्टी उघडकीला येतील असा विश्वास मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केला.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांची राजनैतिक आणि परराष्ट्र धोरणं यामुळं तह्हवुर राणा याचं प्रत्यार्पण प्रत्यक्षात आलं असल्याचं प्रतिपादन केंद्रीय मंत्री अर्जुन राम मेघवाल यांनी केलं. मुंबईत ते पत्रकार परिषदेत बोलत होते. डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त भाजपाकडून विविध कार्यक्रमांचं आयोजन केलं जाणार आहे, असं ते म्हणाले. यावेळी त्यांनी विविध मुद्द्यांवरुन विरोधकांवर टीका केली.

**<><><><><>**

थोर समाजसुधारक, क्रांतीसूर्य महात्मा जोतिबा फुले यांच्या जयंतीनिमित्त त्यांना विविध कार्यक्रमांच्या माध्यमातून अभिवादन करण्यात येत आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी महात्मा फुले यांना आदरांजली वाहिली. महात्मा फुले हे मानवतेचे खरे सेवक होते, त्यांनी समाजातल्या शोषित आणि वंचित घटकांच्या कल्याणासाठी आपलं जीवन समर्पित केलं. देशासाठी त्यांचं अमूल्य योगदान प्रत्येक पिढीला प्रेरणा देत राहील, असं त्यांनी समाज माध्यमावरच्या संदेशात म्हटलं आहे.

**<><><><><>**

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा दोन दिवसांच्या राज्याच्या दौऱ्यावर येत आहेत. रायगड किल्ल्यावर छत्रपती शिवाजी महाराजांच्या ३४५ व्या पुण्यतिथी निमित्त होणाऱ्या कार्यक्रमात उद्या ते भाग घेतील. त्यापूर्वी किल्ले रायगडाच्या पायथ्याशी पाचाड इथं राजमाता जिजाऊ यांच्या समाधीचं ते दर्शन घेतील.

**<><><><><>**

अमेरिकेनं अतिरीक्त कर लादायला स्थगिती दिल्यानं देशातले शेअर बाजारात आज जोरदार तेजीत होते. सेन्सेक्समधे आज दिवसअखेर १ हजार ३१० अंकांची वाढ

झाली, आणि तो ७५ हजार १५७ अंकांवर बंद झाला. निफ्टीही ४२९ अंकांची वाढ नोंदवत २२ हजार ८२९ अंकांवर बंद झाला.

देशात आज सोनं तोळ्यामागे सुमारे ३ हजार रुपयांनी महागलं. मुंबईत २४ कॅरेट सोन्याचे दर तोळ्यामागे ९५ हजारांच्या ८६२ रुपयांच्या पलीकडे पोहोचलं. २२ कॅरेट सोन्याचे दर ९३ हजार ५०० रुपयांपेक्षा जास्त होते. चांदीही किलोमागे सुमारे २ हजार रुपयांनी महाग होऊन ९५ हजार ४०० झाली.

**<><><><><>**

प्रसिद्ध उद्योगपती मधुर बजाज यांचं आज पहाटे मुंबईत निधन झालं. ते ६३ वर्षांचे होते. गेले काही दिवस मुंबईच्या ब्रीच कँडी रुग्णालयात त्यांच्यावर उपचार सुरु होते. देशातल्या अग्रणी दुचाकी वाहन उद्योग बजाज ऑटोचे ते मानद संचालक होते. त्याखेरीज महाराष्ट्र स्कूटर लिमिटेड चे अध्यक्ष होते.

**<><><><><>**

वेव्हजची राष्ट्रीय स्तरावरची दक्षिण विभागाच्या व्ही एफ एक्स स्पर्धेची अंतिम फेरी आज बंगळुरू इथं पार पडली. केंद्रीय माहिती आणि प्रसारण मंत्रालयानं जैन विद्यापीठ आणि अभय फाऊंडेशन यांच्या सहयोगानं ही स्पर्धा आयोजित केली होती. या फेरीसाठी १ हजाराहून अधिक स्पर्धकांमधून १४ जणांची निवड करण्यात आली होती. आजच्या विभागीय अंतिम फेरीच्या विजेत्याला मुंबईत होणाऱ्या राष्ट्रीय स्तरावरच्या अंतिम फेरीसाठी पाठवलं जाणार आहे, अशी माहिती अभय फाऊंडेशनचे सचिव आर. के. चंद यांनी दिली.

**<><><><><>**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज चेन्नई सुपर किंग्ज आणि कोलकता नाईट राईडर यांच्यात सामना सुरू आहे. चेन्नईच्या चिदंबरम स्टेडिअमवर सुरू असलेल्या या

सामन्यात कोलकातानं नाणेफेक जिंकून क्षेत्ररक्षणाचा निर्णय घेतला. शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा नवव्या षटकात चेन्नईच्या २ बाद ५६ धावा झाल्या होत्या.

**//<><><><><>//**